# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन परिपत्रक क्रं मवैअ-१०५४/प्रक्र२४१/भाग २/सेवा ३ सार्वजनिक आरोग्य विभाग, दि ४/७/२०१९ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत निव्वळ कंत्राटी स्वरुपात (एकत्रित मानधनावर) ११ महिने कालावधी करिता अहमदनगर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी रिक्त पदांवर खाली नमुद केलेनुसार वैद्यकीय अधिकारी,गट-अ पदावर नेमणूका करण्यात येणार आहे.

| अ. क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी गट-अ | बी ए एम एस | आदिवासी व दुर्गम भाग रु.४५,०००/-<br>इतर भाग रु.४०,०००/- | ७० ( रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.) |
| | | | | |

**-: अटी व शर्ती :-**

१) कंत्राटी वैद्यकीय अधिकारी हे शासकिय नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

२) कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्व सूचना न देता समाप्त करण्यात येतील.

i) दोन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर

ii) कामामध्ये निष्काळजीपणा

iii) बायोमॅट्रिक प्रणालीवर हजेरी न लावणे

iv) कामकाज अकार्यक्षम असणे / सेवेची कर्तव्ये व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास

v) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे

vi) कार्यरत पदावर नियमित/बंधपत्रित /कंत्राटी एम बी बी एस वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती झाल्यास

३) अर्ज करणा-या उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४) निवड झालेल्या वैद्यकीय अधिका-यांनी नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल. तसेच बायोमॅट्रिक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.तसेच वेतन हे बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीवर अदा केले जाईल.

५) निवड झालेले वैद्यकीय अधिकारी १ महिन्याची आगाऊ सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देवून कार्यमुक्त होवू शकतील.

६) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकीय अधिका-यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

i) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकीय अधिकारी

ii) शासन सेवेत ५८ वर्ष सेवा पुर्ण करुन सेवानिवृत्त झालेले वैद्यकीय अधिकारी

iii) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी

iv) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले

Scanned by CamScanner

वैद्यकीय अधिकारी

७) नियमित अथवा बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकीय अधिका-यांची सेवा समाप्त करतांना जो वैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी शेवटी रुजू झालेला आहे त्याची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी रिक्त पद असलेस त्या ठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.

८) वैद्यकीय अधिका-यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच इतर अन्य मागण्यांसाठी आंदोलन / संप / बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही तसेच मुख्यालयी राहून २४ तास सेवा देईल अशा आशयाचे बंधपत्र १००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.

९)या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही

१०)शासन सेवा शर्ती खाली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

११)वरिल पदासाठी अर्ज सोबतच्या नमुन्याप्रमाणे लिहून पासपोर्ट साईज फोटो चिकटवून सोबत शैक्षणिक अर्हता गुणपत्रिका व प्रमाणपत्रांसह (पदवी/पदवीका,पासिंग व अटेंम्ट), जात पडताळणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला (शाळा सोडल्याचा दाखला), आयुर्वेद मेडीकल कौन्सिल रजिष्ट्रेशन इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१२)प्रस्तुत अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार समितीकडे राखीव राहतील.

१३)निवड ही उमेदवारांना बी ए एम एस तृतीय वर्षाच्या गुणांच्या आधारे (८०%) व वैद्यकीय अधिकारी म्हणून कामाचा अनुभव (शासकीय रुग्णालय/निम शासकीय/जिल्हापरिषद/नगरपालिका/महानगरपालिका अथवा राष्टीय आरोग्य अभियान यांचा ग्राह्य धरला जाईल व यासाठी सक्षम अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रमाण पत्र सादर करावे लागेल.) प्रति वर्ष २ या प्रमाणे (जास्तीस जास्त१० गुण) या प्रमाणे मेरीट यादी तयार करुन एकास दोन या प्रमाणे उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल. मुलाखतीची तारीख दि २१/८/२०१९ रोजी मेरीट यादीबरोबर जाहीर केली जाईल.मेरिट लिस्ट ही जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अहमदनगर येथे प्रसिध्द करण्यांत येईल.त्याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१४)निवड समितीदारे जिल्हयामधील कुठल्याही प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नेमणूक दिली जाईल.व उमेदवार त्या पदस्थापनेस बांधील राहील.तसेच त्याठिकाणी मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

वेळापत्रक

| अ क्रं | अर्ज स्विकारण्याची तारीख व स्थळ | मेरिट यादी प्रसिध्द करणे |
|---|---|---|
| १ | ६/८/२०१९ ते १६/८/२०१९<br>(शासकीय सुटीचे दिवस सोडून)<br>स्थळ:-जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय अहमदनगर | २१/८/२०१९<br>स्थळ : जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अहमदनगर. |
| | | |

सदस्य सचिव तथा
जिल्हा शल्य चिकीत्सक,अहमदनगर

Scanned by CamScanner

# अर्जाचा नमुना

## कंत्राटी वैद्यकिय अधिकारी या पदासाठी अर्ज

अर्जदाराचा फोटो

प्रति,
मा.सदस्य सचिव तथा,
जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय,अहमदनगर.

अर्जदाराचे संपुर्ण नाव - ..............................................................................

अर्जदाराचा संपुर्ण पत्ता - ..............................................................................

जन्मतारिख ..............................

भ्रमणध्वनी क्रमांक (संपर्कासाठी) - ......................................

अर्जदाराचा ई-मेल आय.डी.-..............................................

शैक्षणिक अर्हता -

| अ.क्र. | पदवी / पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका | विदयापीठाचे नाव | वर्षनिहाय मिळालेल्या गुणांची टक्केवारी | नोंदणी क्र |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

अनुभव -

| अ.क्र | कार्यालयाचे नाव (शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, राष्ट्रीय आरोग्य अभियान) | पदाचे नाव | अनुभवाचा कालावधी (एकुण वर्ष) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

अर्जदाराची स्वाक्षरी

Scanned by CamScanner